**नि.दि.दा.क्र.१२९/२०१२**
**दामोदर वि. गोरोबा व इतर**
**CNR No.MHOS130004342012**

**निशानी क्र.१०० च्या अर्जावरील आदेश**
(घोषीत दिनांक – २३.०१.२०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मयत वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांचे विरुध्दचा दावा अपशमचा आदेश रद्द होऊन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**०२.** अर्जदारांच्या कथनाप्रमाणे, वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे हे दिनांक २५.०४.२०२५ रोजी मयत झाले असुन त्यांच्या वारस मुदतीमध्ये अभिलेखावर घेतले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द दावा हा ॲबेट झाला आहे. वादीने वादी नं.२/अ विरुध्द abatement set aside चा अर्ज देण्यास हेतुपुरस्कर विलंब केलेला नाही. वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांचे वारस हे मुंबई येथे राहत असल्याकारणाने अर्जदारांनी वादी नं.२/अ च्या विरोधातील abatement set aside चा अर्ज मुदतीत दिला नाही. अर्जदारांनी हेतुपुरस्कर विलंब केलेला नाही. तसेच वर नमुद विलंब हा नाममात्र स्वरुपाचा आहे. मयत वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे चे वारस अभिलेखावर न घेतल्यास अर्जदारांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. कारण दाव्यातील विवाद्य जमीनीमध्ये अर्जदाराचे हितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळे अर्जदारांनी मयत वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांचे विरुध्द दावा अपशमचा आदेश रद्द होणेसाठी मागणी केली आहे.

०३. प्रतिवादी हे सदरच्या अर्जास म्हणणे दिले असुन त्यांच्या म्हणण्यानुसार सदरचा अर्ज संयुक्तीक नाही. म्हणून सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा विकल्पाने अर्ज मंजुर केल्यास सदरचा अर्ज हा दंडासह मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

०४. प्रस्तुत अर्ज, वादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद व अभिलेखावरुन असे दिसुन येते की, प्रस्तुतचे प्रकरण हे वादीने मालकी हक्क जाहीर करण्याकरता व निरंतर मनाई मिळणेबाबत दाखल केले असुन दाव्यामध्ये अपशमचा आदेश रद्द न झाल्यास अर्जदारांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यांत यावा अशी अर्जदारांनी विनंती केली आहे. याउलट प्रतिवादीचे वकीलांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०५. प्रकरणाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा मालकी हक्क जाहीर करण्याकरता व निरंतर मनाई मिळणेबाबत दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्जदारांतर्फे देण्यात आलेले कारण हे संयुक्तीक वाटते. तसेच अभिलेखावर दाखल असलेले मयत वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांच्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता मयत वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे हे दिनांक २५.०४.२०२५ रोजी मयत असल्याचे दिसुन येते. प्रस्तुतच्या दाव्याचे स्वरुप पाहता वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद हा गुणदोषावर चालून निर्णित होणे आवश्यक ठरते. त्यामुळे वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे चे वारस अभिलेखावर घेणे न्यायोचित ठरेल. परंतु, विलंबाच्या कालावधीचा विचार करता अर्जदारांवर ३००/– रुपये इतका दंड बसवून प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे आवश्यक ठरेल. परिणामतः खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यांत येतो.

# <u>आदेश</u>

१. प्रस्तुत **निशानी क्र.१००** वरील अर्ज रक्कम **रुपये ३००/-(रुपये तीनशे फक्त)** इतक्या रकमेच्या दंडावर मंजुर करण्यांत येत आहे. प्रस्तुतचा दंड अर्जदार यांनी प्रतिवादी यांना पुढील तारखेस अथवा त्या अगोदर देण्याचे आहे.

२. वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांचेविरुध्द झालेला दावा अपशमचा आदेश रद्द करण्यांत येत आहे.

MATE ASHLESHA SOUDAGAR

Digitally signed by MATE ASHLESHA SOUDAGAR
Date: 2026.01.23 17:50:57 +0530

दिनांक : २३.०१.२०२६

( **श्रीमती अश्लेषा एस. मते** )
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम.

नि.दि.दा.क्र.१२९/२०१२

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | ... | N. V. Koli<br>Stenographer Grade-III |
| Court | ... | 2nd Jt. Civil Court Jr. Dn., Bhoom. |
| Date | ... | 23.01.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | ... | 23.01.2026 |
| Order uploaded on | ... | 23.01.2026 |